
मुक्त

# शब्द

जून २०२३
मूल्य : ७० रुपये
Mukta Shabd : ISSN 2347-3150

## रख हौसला, कर फ़ैसला, तुझे वक्त बदलना है!



# मुक्त शब्द

वर्ष तेरावे ISSN 2347-3150

जून २०२५ मूल्य : ५० रुपये

संपादक – यशोधन (येशू) पाटील

कार्यकारी संपादक – प्राजक्ती चसी

संपादकीय सल्लागार मंडळ – हरिश्चंद्र थोरात
राहुल कोसम्बी
केशव वाघमारे
वंदना भागवत
उदय रोटे

अक्षरजुळणी व मांडणी – मिलिंद के. एस.

मुद्रक – रचना प्रिंटर्स



या अंकातील मजकुराशी मालक, प्रकाशक, संपादक सहमत असतीलच असे नाही.




**'मुक्त शब्द'** हे मासिक मुद्रक, प्रकाशक आणि मालक - **यशोधन पाटील** यांनी रचना प्रिंटर्स, २५ येहा इंडस्ट्रिअल इस्टेट बोरीवली (पूर्व), मुंबई ४०००६६, येथून प्रसिद्ध केले.



**पत्रव्यवहार आणि वर्गणीसाठी पत्ता :**
'शब्द पब्लिकेशन', ५/२०१, जनकल्याण, मढिए नाका, बोरीवली (पश्चिम), मुंबई ४०० ०९१
मोबाइल : ८६५५५४ ९५८०४ / ९८२०१ ४७२८४
Email : muktashabd@gmail.com
Bank Accounts -
**Shabd Publication :** Punjab & Sind Bank
(Borivali, Mumbai)
(IFSC Code : PSIB0000647)
A/c. No. : 06471100008291


## अनुक्रम


संपादकीय / ४
अडगळीचे अलंकारशास्त्र : ६ - हरिश्चंद्र थोरात / ७
रेडशिफ्ट (कथा) - जिग्ना सिरसुटे / ३१
हिंदू समाजव्यवस्था : तिची अनन्यसाधारण वैशिष्ट्ये
- बी. आर. आंबेडकर / ४०
'तल्लुमाला': अभूतपूर्व माल्याळ
आणि पौरुषत्वाचे विडंबन - ... / ५०
श्याम बेनेगल : समांतर सिनेमाचा विकासक्रम
- कुणाल ... / ५४
मराठी नट्या - मेघना भुस्कुटे / ५८
मांगल लावलेला घोडा (पुस्तक परीक्षण)
- रंजन ... जोशी / ६०
कविता - पूर्वा ... / ६६
प्रतिमा ... / ६७
मेजर रॉबर्ट गील आणि पारोची प्रेमकथा (भाग १)
- वीणा गवाणकर / ६९
ख्याल-आदि-रागातील पंचमस्वराची भूमिका आणि ख्यालमधील संवाद यांचे सौंदर्यात्मक विश्लेषण
- शैलेश मोरे / ७५

# एक देश एक शिधापत्रिका – विश्लेषण

**पंकज मा तायडे,**
सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश आर्टस् कॉलेज
पिंजर जी. अकोला

सार्वजनिक वितरण प्रणाली भारतातील महत्वपूर्ण सामाजिक कल्याण कार्यक्रम आहे. प्रस्तुत कार्यक्रमात देशातील गरीब कुटुंबांना लक्षियत गट म्हणून निवडून लाभ दिल्या जातो. ते प्रामुख्यानेआदिवासी आणि सार्वत्रिकपणे दुष्काळग्रस्त भागातील कुटुंब असतात. लाभार्थी अनेक वेळा रोजगाराच्या निमित्ताने इतर राज्यात स्थलांतरित होतात. अश्या स्थितीत लाभार्थी स्थलांतरित परिसरातील रास्त भाव दुकानातून धान्य खरेदी करू शकत नाही. या वर उपाय म्हणून एक देश एक शिधापत्रिका कार्यक्रम राबवल्या जातो. सदर योजना देशातील वीसराज्यांमध्ये अन्न विभागामार्फत तंत्रज्ञानाच्या मदतीने चालवला जातो. लाभार्थ्यांना भारतातील कोणत्याही दुकानातून धान्य खरेदी करण्याची सोय या योजनेमुळे झाली.शोधनिबंधातया योजनेचा आढावा घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. योजनेचे अनेक फायदे असल्याचे दिसून आले. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतशिधापत्रिकाधारकाला त्याच्या रहिवास क्षेत्रांतीलस्वस्त धान्य दुकानातून सवलतीच्या दरात अन्नधान्य खरेदी करता येते. एक देश एक शिधापत्रिका योजना त्यांच्या मूळ जिल्ह्यातून स्थलांतरित झालेल्या गरीब कामगारांना स्थलांतरित भागात पुरेसे अन्नधान्य उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे भुकेने मृत्यूचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. स्वस्त धान्य दुकानदारलाभार्थी उपलब्ध नसल्यामुळे उरलेलेधान्याचा काळाबाजार करत असत. या योजनेमुळे तसे करणे अशक्य झाले.

**प्रस्तावना-**

सार्वजनिक वितरण व्यवस्था असुरक्षित वर्गाची अन्न सुरक्षा सुनिश्चित करते. भारत सरकारने सार्वजनिक अन्न वितरणाचे मोठे जाळे विकसित केले आहे. गरजू व्यक्तींना जीवनावश्यक वस्तूंचे वितरण करण्याचे उद्दिष्टयामाध्यमातून पूर्ण करण्याचा प्रयत्न होतो. कृषी उत्पादनाला प्रोत्साहनपर किंमत देऊनसवलतीच्या दरातील अन्नधान्यासह शेतकऱ्यांचे वास्तविक उत्पन्न वाढवल्या जाते. अन्नधान्य वितरण कार्यक्रम भारतातील सर्वात मौल्यवान सामाजिक कल्याण योजना आहे. या कार्यक्रमात गरीब कुटुंबांना शोधून लाभ दिल्या जातात. ते प्रामुख्याने आदिवासी आणि दुष्काळग्रस्त क्षेत्रातील असतात. अनेक वेळा लाभार्थी रोजगार शोधण्यासाठी इतर राज्यात स्थलांतरित होतात. पुढील काही वर्षे ते तिथेच स्थायिक होतात. असे लाभार्थी स्थलांतरित परिसरातील स्वस्त धान्य दुकानातून धान्य खरेदी करू शकत नाही. अशा स्थितीत त्यांना स्थलांतरित क्षेत्रात धान्य मिळत नसल्यास त्यांची अन्न धान्याची गरज पूर्ण होणार नाही. यावर उपाय म्हणून शासनाने तंत्रज्ञान विकसित करून धान्य वितरण व्यवस्था प्रभावी करण्यासाठी सरकारने एक देश एक शिधापत्रिका योजना अस्तित्वात आणली. एक देश एक शिधापत्रिका कार्यक्रम भारतातील२० राज्यांमध्ये अन्न

विभागामार्फत तंत्रज्ञानाच्या मदतीने चालवला जातो. यामुळे लाभार्थ्यांना भारतातील कोणत्याही दुकानातून धान्य खरेदी करण्यास मदत करते.

**अभ्यासाची उद्दिष्टे-**

एक देश एक शिधापत्रिका योजना सार्वजनिक वितरण व्यवस्थेला अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक बनवते. तसेच त्याची पद्धती कशी कार्य करते याचा आढावा प्रस्तुत शोधनिबंधात घेतला आहे. त्यासाठी शोधनिबंधाचे खालील प्रमाणे उद्देश निश्चित केले आहेत.

१. सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या मुलभूत कार्यपद्धतीचा अभ्यास करणे.
२. सा वि व्यवस्थेने स्वीकारलेल्या तंत्रज्ञानाचे विश्लेषण करणे.
३. एक देश एक शिधापत्रिकायोजनेचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :-**

उपरोक्त निश्चित उद्दिष्टांचा अभ्यास करण्यासाठी दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. सर्व प्रकाशित आणि अप्रकाशित साहित्याचा दुय्यम सामुग्री मध्ये समावेश होतो.

**सार्वजनिक वितरण व्यवस्था:-**

अन्नधान्या बाबत असुरक्षित लोकसंख्येला अनुदानित अन्नधान्य मिळवून देण्याच्या विशेष उद्देशाने सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरु करण्यात आली. सन १९४३ मध्ये पश्चिम बंगालमध्ये अन्नधान्य टंचाई निर्माण झाली होती. लाखो लोक अन्नधान्य न मिळाल्यामुळे मृत्युमुखी पडले. तेव्हा भारतात ब्रिटीशांचे राज्य होते. त्यांनी देशातील काही भागात जसे मुंबई येथे गरजूंना सवलतीच्या दरात अन्नधान्य वाटण्यास प्राधान्य दिले होते. त्याचा आदर्श घेवून पश्चिम बंगाल च्या टंचाईग्रस्त भागात अन्नधान्य वाटप करण्याचे धोरण निश्चीत करण्यासाठी सर देवधर ग्रेव्हरी यांच्या अध्यक्षतेखाली १९४३ साली समिती गठीत करण्यात आली. या समितीच्या शिफारशी वरून देशात सार्वजनिक वितरण व्यवस्था अस्तित्वात आली. अन्नधान्य खरेदी समितीने सुचविल्यानुसार १९६० साली सा वि व्यवस्थेचा विस्तार करण्यात आला.विविध नवकल्पनांद्वारे पुढे सदर योजना अधिक प्रभावी होत गेली. १९७० च्या दशकापर्यंत सार्वजनिक वितरण व्यवस्थाअनुदानित अन्न वितरणाची सार्वत्रिक योजना म्हणून ओळखल्या जावू लागली.

अन्न धान्य वितरण करणारी ही व्यवस्था अजून सक्षम करण्यासाठी पद्धतशीर प्रयत्न करण्यात आले. त्याचाच एक भाग म्हणून पूर्वीची वितरण व्यवस्था १९९१ साली सुधारित सार्वजनिक वितरण व्यवस्था म्हणून लाभार्थी पर्यंत पोहचू लागली.गरीबांतील गरीबांचे संरक्षण करण्यासाठी १९९७ मध्ये सरकारने लक्ष्यित सार्वजनिक वितरण प्रणालीतरुपांतर केले. नंतर अंत्योदय अन्न योजना २००० साली,अन्नपूर्णा योजना २००१ साली आणि राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा-२०१३द्वारे देशातील बहुतांश लोकसंख्येपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला. राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदादेशाच्या ८० टक्के लोकसंख्येपर्यंत सार्वजनिक वितरण व्यवस्थेची व्याप्ती वाढवतो.

## सा वि व्यवस्थेतील तांत्रिक सुधारणा

अन्न धान्य वितरणाची व्यवस्था अधिक सक्षम आणि पारदर्शी करण्यासाठी अनेक संस्थांनी संशोधन केले. ह्या अभ्यासात अंमलबजावणीतील काही उणिवा निदर्शनास आणून दिल्या आहेत.जसे की अन्नधान्याची गळती, चुकीची लाभार्थी निवड प्रक्रिया आणि तृटीयुक्त वितरण पद्धती अश्या अडचणी निदर्शनास आल्या. संशोधन अहवालांनी दिलेल्या शिफारशींनुसार सरकारने या उणीवा दूर करण्यासाठी उपाययोजना केल्या आहेत. संपूर्ण सुधारणा मध्ये वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण एक महत्त्वाचे पाऊल ठरले.

माननीय सर्वोच्च न्यायालयाने डब्ल्यू पी सी क्रमांक १९६/२००१- पीयुसीएल विरुध्द केंद्र सरकार व इतर या केसमध्ये लक्षधारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण करण्याबाबत आदेश दिले. दिनांक २७ जुलै २०१० च्या आदेशातमाननीय सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले की,सर्वोच्च प्राधान्याच्या आधारावर सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपूर्ण संगणकीकरण करणे आवश्यक आहे.भारतीय सरकारनेसंगणकीकृत तंत्रज्ञान विकसित करावे आणि तेच सॉफ्टवेअर सर्व राज्यांनी वापरावे असे आदेश दिले. पुन्हा १४ सप्टेंबर २०११ रोजीच्या आपल्या आदेशातमाननीय सर्वोच्च न्यायालयाने इतर बाबींमध्ये निर्देश दिले की,संगणकीकरणासाठी आवश्यक पायाभूत सुविधा आणि आर्थिक सहाय्य प्रदान करण्याची खात्री भारत सरकार ने द्यावी. त्यानुसार भारत सरकारने शासकीय अधिसूचना दि. १० डिसेंबर २०१२ रोजी अधिसूचना काढली. ग्राहक संरक्षण व अन्न वितरण मंत्रालयभारत सरकार यांनी त्यांच्या अधिसूचना क्रमांक २३(६)/२००८-पीडी-२/कॉम्पु-वोल्यू५ नुसार १२ व्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये लक्षधारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे शेवटच्या घटका पर्यंत संगणकीकरण करण्यास प्रशासकीय मान्यता दिली. प्रकल्पाची एकूण किंमत रु.८८४.०७ कोटी होती.त्यापैकी भारत सरकारचा हिस्सा रु.४८९.३७ कोटी आणि राज्य/केंद्रशासित प्रदेशांचा हिस्सा रु.३९४.७० कोटी होता. एक देश एक शिधापत्रिका योजना लागू करण्यासाठी या तंत्रज्ञानाचा मोठा फायदा झाला.

तांत्रिक सुधारणांचे प्रमुख घटक म्हणजे लाभार्थी आणि इतर डेटाबेसचे डिजिटलायझेशन आणि पुरवठा साखळी व्यवस्थापनाचे संगणकीकरण होते. संकेतस्थळ आणि तक्रार निवारण यंत्रणा चुकीच्या आणि अपात्र लाभार्थ्यांचा शोध घेणे आणि तक्रारींचे निवारण करण्यासाठी लाभदायक ठरली. यामुळे व्यवस्थेचे सामाजिक परीक्षण आणि तक्रार निवारण करणे तसेच लाभार्थ्यांची अन्नधान्याची खात्रीशीर गरज पूर्ण करणे देखील सुलभ झाले.

## एक देश एक शिधापत्रिका योजना

अन्न धान्य वितरण विभागाने एप्रिल २०१८ साली सर्व राज्ये तसेच केंद्रशासित प्रदेशांच्या सहकार्याने सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे एकात्मिक व्यवस्थापनकार्यान्वित केले. राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा अंतर्गत शिधापत्रिकांचा देशव्यापी वापरकरणे हेएक देश एक शिधापत्रिका योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. नवीन शिधापत्रिका न घेता देशातील कोणत्याही रास्त भाव दुकानातून त्यांचे हक्काचे धान्य उचलण्यास मदत होते. या प्रणालीचा फायदा असंख्य स्थलांतरित लाभार्थ्यांना होतो जे वारंवार रोजगाराच्या शोधात आपले मुख्यगावसोडतात. प्रस्तुत प्रणालीद्वारे असे लाभार्थी त्यांच्या अन्नसुरक्षेत प्रवेश करू शकतील. लाभार्थी दुसऱ्या राज्य/केंद्रशासित प्रदेशातील स्वस्त धान्य दुकानात

बायोमेट्रिक प्रमाणीकरणानंतर त्यांना मंजूर अन्नधान्यपूर्वीचीच शिधापत्रिका वापरून मिळवू शकतात.

तत्कालीन केंद्रीय अन्न नागरी पुरवठा मंत्री रामविलास पासवान यांनी सन २०१९ मध्ये चार राज्यांमध्ये 'एक देश एक शिधापत्रिका'योजनेच्या पथदर्शी प्रकल्पाची घोषणा केली होती. सदरयोजना १ जानेवारी २०२० पासून भारतातील १२ राज्यांमध्ये लागू करण्यात आली. मध्यप्रदेश, महाराष्ट्र,गोवा,गुजरात,झारखंड,कर्नाटक,तेलंगणा,राजस्थान,केरळ,त्रिपुरा,हरियाणा आणि आंध्र प्रदेश ही ते बारा राज्ये आहेत.सद्यस्थितीत या योजनेत२६ राज्ये समाविष्ट आहेत. त्यानंतरइतर राज्ये तथा केंद्रशासित प्रदेशांमध्ये शिधापत्रिकांचेराष्ट्रीय संचारनसुरू करण्यात येईल. सर्व राज्ये तथा केंद्रशासित प्रदेशात बायोमेट्रिक प्रमाणीकरण करून बनावट शिधापत्रिकांचे शोध घेण्यात येईल तेव्हा ही वितरण व्यवस्था अधिक सक्षम होईल. सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये एक देश एक शिधापत्रिका योजना मार्च २०२१ पर्यंत लागू करण्याची घोषणाअर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी गुरुवार,१२ मे २०२० केली होती. आत्तापर्यंतअंमलबजावणीसाठी २६ राज्ये तयार झाली आहेत आणि तिथे सुरु पण झाली आहे.

**एक देश एक शिधापत्रिका योजनाकार्यपद्धती-**

योजनेचा मूळ उद्देश देशभरातील गरीब घटकांना पुरेसे अन्नधान्य उपलब्ध करून देणे हा आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये शिधापत्रिका धारकास धान्य वाटप केले जाते. अन्नधान्य प्राप्त करण्यासाठी शिधापत्रिका ज्या स्वस्त धान्य दुकानास जोडली असेल तिथे जावे लागते. हे दुकान त्याच्या कायम रहिवास क्षेत्रात असते. लाभार्थी याशिवाय इतर दुकानातून धान्य प्राप्त करून घेवू शकत नाही. सदर योजने मध्ये लाभार्थी देशाच्या कोणत्याही स्वस्त धान्य दुकानातून अन्नधान्य वस्तू खरेदी करू शकतात. या योजनेत शिधापत्रिका देशातील कोणत्याही राज्यातील दुकानात वापरता येते. समजा एखादा लाभार्थी महाराष्ट्रातील एखाद्या जिल्ह्यातील रहिवासी आहे आणि तो कोणत्याही कारणाने दिल्लीत स्थलांतरित झाला आहे. अशास्थितीतशिधापत्रिकाधारकाला दिल्ली परिसरात अन्नधान्य मिळू शकत नाही. तथापि एक देश एक शिधापत्रिका योजनेंतर्गतलाभार्थ्याला जुन्या शिधापत्रिकेसह नवीन परिसरातून अनुदानित धान्य मिळू शकते. ही योजना राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा -२०१३ अंतर्गत कार्यरत आहे.

प्रस्तुत योजना पूर्णपणे तंत्रज्ञानाच्या सहायाने चालवली जाते.सा वि व्यवस्थेचे संपूर्ण संगणकीकरण केल्यामुळेच योजना देशभरात चालवण्यास मदत होते. सर्व शिधापत्रिकाधारक त्यांचे आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक आहे. सर्व कार्ड धारकांची माहिती तंत्रज्ञानाच्या सहायाने साठवून ठेवल्या जाते.याचा फायदा लाभार्थ्याला देशातील कोणत्याही स्वस्त धान्य दुकानात ओळखण्यास मदत होते. सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे एकात्मिक व्यवस्थापन संकेतस्थळ(http://www.impds.nic.in/portal) शिधापत्रिकांच्या आंतर-राज्य वहनासाठी तांत्रिक व्यासपीठ प्रदान करते. उपरोक्त संकेतस्थळ स्थलांतरित देशवासियांना देशभरातील कोणत्याही स्व.धा. दुकानातून अन्नधान्य खरेदी करण्यास सक्षम बनवते.

**योजनेची सद्यस्थिती-**

देशात १ जानेवारी २०२० रोजी पथदर्शी प्रकल्प म्हणून प्रस्तुत योजना प्रस्तावित करण्यात आली होती. सध्यस्थितीत योजना २७ राज्यांमध्ये धान्यवितरणसाठी उपलब्ध आहे. संकेस्थळावर प्रकाशित आकडेवारीनुसार या सुविधेचा वापर करून झालेल्या व्यवहारांची संख्या खूप जास्त आहे. १६ जानेवारी २०२४रोजी च्या स्थितीनुसार ४,१४,३३७ शिधापत्रिका धारकांनी आपल्या स्थायी रहिवास क्षेत्राऐवजी दुसऱ्या राज्यात तथा जिल्ह्यातून अन्नधान्य प्राप्त केले. याचा १८,९७,५०३ लाभार्थ्यांना लाभ घेता आला. सदर शिधापत्रिका धारकांनी केलेल्या व्यवहारांची संख्या ४,२३,९७७ असल्याचे दिसते. संपूर्ण आंतरराज्यीय व्यवहारात दिल्ली राज्य आघाडीवर असल्याचे माहितीतून उघड होते. दिल्ली येथे वेगवेगळया राज्यातील शिधापत्रिकाधारकांनी केलेल्या व्यवहारांची संख्या ३,४२,३७३ असून यात बिहार मधील शिधापत्रिकाधारकांची संख्या १,६०,१८४ लक्षणीय आहे.अन्नवितरण संकेतस्थळावरील माहितीनुसारया योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या एकात्मिक व्यवस्थापन प्रणालीवर उपलब्ध माहितीनुसार योजना चालवणारी २७ राज्ये आहेत.४,१४,३३७ शिधापत्रिकांच्यामाध्यमातून एकूण १८.९७,५०३ लाभार्थ्यांनी स्थलांतरित वस्तीतून धान्य खरेदी केले. ही सोय उपलब्ध नसती तर उपरोक्त लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहिले असते.

**एक देश एक शिधापत्रिका योजनाफायदे:-**

स्थलांतरित लाभार्थ्यांच्या संरक्षणासाठी ही योजना काम करते ही बाब वरील चर्चेवरून स्पष्ट होते.बऱ्याचदा शिधापत्रिकाधारक रोजगाराच्या मिळवण्याच्या आशेने एका राज्यातून दुसऱ्या जिल्ह्यात किंवा राज्यात जातात. अशावेळी त्यांना धान्यापासून वंचित राहवे लागत होते. अशा परिस्थितीत ही योजना अधिक फायदेशीर ठरली. खाली नमूद केल्याप्रमाणे योजनेचे फायदे आहेत.

- सार्वजनिक वितरण व्यवस्थेत केवळ स्थानिक क्षेत्रातील निश्चित स्वस्त धान्य दुकानातून अन्नधान्य खरेदी करू शकतो.पण या योजनेने स्थलांतरित लाभार्थ्यांना स्थलांतरित प्रदेशातून अन्नधान्य मिळवण्याची सोय झाली आहे.
- स्थलांतरित प्रदेशात अन्नधान्य मिळाल्यामुळे उपासमारीतून होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कमी होईल अशी अशा निर्माण होते.
- जागतिक भूकबळी निर्देशांकातील क्रमांक कमी होण्यास मदत होईल.
- स्वस्त धान्य दुकानातील वितरीत न झालेल्या अन्नधान्याचा काळाबाजार थांबवण्यास मदत होईल.
- लाभार्थ्यांना वापरण्यास सोयीस्कर योजना आहे.
- भ्रष्टाचार दूर करण्यासाठी उपयुक्त वाटते.

**निष्कर्ष**

सार्वजनिक वितरण प्रणालीचे एकात्मिक व्यवस्थापनपोर्टल एक देश एक शिधापत्रिका योजनेसाठी तांत्रिक व्यासपीठ प्रदान करते. सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या अंमलबजावणीत हा अद्भूत बदल आहे.यामुळे समाजाची अन्नसुरक्षा सुनिश्चित करण्यात मदत होते. त्यामुळे गरिबांना

परवडणाऱ्या किमतीत अन्नधान्य उपलब्ध होण्यास मदत झाली आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमुळे भूकबळी आणि गरिबी कमी होण्यास मदत होते. परंतु स्थलांतरित लाभार्थ्यांना शिधापत्रिकेद्वारे स्थलांतरित भागामधून अन्नधान्य मिळू न शकने हा या व्यवस्थेचा दोष होता.एक देश एक शिधापत्रिका योजनेमुळे हा दोष दूर करण्यास मदत झाली. आता गरीबांना देशातील कोणत्याही राज्यातून अन्नधान्य मिळू शकते. याचा फायदा उपासमारी आणि भ्रष्टाचार कमी करण्यात झाला. म्हणूनच हा शोधनिबंध ही बाब स्पष्ट करतो की, 'एक देश एक शिधापत्रिका योजना' सार्वजनिक वितरण व्यवस्थेलाअधिक पारदर्शक आणि प्रभावी बनवते.

**संदर्भ :-**

1. Sharma Anuradha- Organisation And Management of Public Distribution System, Anmol Publications Pvt. Ltd. New Delhi, 2002
2. Verma B.N., Prasad Smriti- Vulnerable Population and Public Distribution System, Uppal Publishing House, New Delhi, 1991
3. Vyas S.V., Food Security in Asian Countries in the Context of Millennium Goals, Academic Foundation, New Delhi, 2005
4. Economic Survey 2019-20, Volume 2, Ministry of Finance, Government of India.
5. https://economictimes.indiatimes.com/news/politics-and-nation/aadhaar-helped-cancel-3-crore-fake-duplicate-ration-cards-minister/articleshow/63082030.cms?from=mdr, dt 12/01/2024
6. https://pib.gov.in/PressReleasePage.aspx?PRID=1628288, dt.14/1/2024
7. http://www.impds.nic.in/portal, dt. 16/1/2024
8. https://annavitran.nic.in/welcome, dt.14/1/2024

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

Home

UGC

Search

# UGC-CARE List

## UGC-CARE List

You searched for "**Multi Shabd**". Total Journals : **1**

Search:

| Sr.No. | Journal Title | Publisher | ISSN | E-ISSN | UGC-CARE coverage years | Details |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Multi Shabd (print only) | Shabd Publication | 2347-3150 | NA | from June 2019 to Present | View |

Showing 1 to 1 of 1 entries

Previous 1 Next

Copyright © 2024 Savitribai Phule Pune University. All rights reserved. | Disclaimer